आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१३ फेब्रुवारी २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- २५ लाख टन गहू आणि ५ लाख टन गहू उत्पादनं निर्यात करायला केंद्र सरकारची मंजुरी

- नवी दिल्लीतल्या सरकारी कार्यालयांच्या 'सेवा तीर्थ' या नवीन संकुल परिसराचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, देशात लखपती दीदींची संख्या ६ कोटीवर नेण्याचं उद्दिष्ट ठेवणाऱ्या पीएम राहत योजनेला मंजुरी

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा संपन्न /दोन्ही सभागृहांचं कामकाज येत्या ९ मार्चपर्यंत स्थगित

- माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री आणि रेल्वेमंत्री कान्हू चरण लेंका यांचं निधन

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये १ हजार ४८ अंकांची घसरण

**आणि**

- आशियाई नेमबाजी स्पर्धेत भारताला १३ सुवर्णपदकांसह ३३ पदकं

**<><><><><>**

देशांतर्गत बाजारात गव्हाचे दर स्थिर राहावेत आणि गहू उत्पादकांना चांगला परतावा मिळावा यादृष्टीनं केंद्र सरकारनं २५ लाख टन गहू आणि ५ लाख टन गव्हाचे पदार्थ निर्यात करायला मंजुरी दिली आहे. बाजारातली सध्याची उपलब्धता आणि दराची स्थिती यांचा व्यापक आढावा घेतल्यानंतर हा निर्णय घेतला असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं म्हटलं आहे.

यंदा रब्बी हंगामात गव्हाचं पेरणी क्षेत्र सुमारे सहा लाख एकरनं वाढलं. तर बाजारातला गव्हाचा साठा अंदाचे ७५ लाख टन, म्हणजे गेल्यावर्षीपेक्षा सुमारे ३२ लाख टन जास्त आहे. त्यामुळे या निर्णयानं शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढेल, असा विश्वास मंत्रालयानं व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीतल्या सरकारी कार्यालयांच्या 'सेवा तीर्थ' या नवीन संकुल परिसराचं उद्घाटन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. यावेळी ते म्हणाले…

**होल्ड - बाईट - पीएम सेवातीर्थ**

विकसित भारताच्या दिशेनं सुरु असलेल्या प्रवासातला हा महत्वाचा टप्पा असून नागरिककेंद्री कारभार आणि राष्ट्रीय प्रगतीबाबत सरकारची बांधिलकी यातून प्रतीत होत आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्र्यांचं कार्यालय या संकुलात असून तिथं गेल्यावर प्रधानमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी देशात लखपती दीदींची संख्या ६ कोटीवर नेण्याचं उद्दिष्ट ठेवणाऱ्या पीएम राहत योजनेच्या मंजुरीसाठी केली. कृषी पायाभूत सुविधा निधीत दुप्पट वाढ करण्याच्या तसंच शेतकरी, महिला, युवा आणि दुर्बल घटकांच्या कल्याणासंदर्भात विविध निर्णयांच्या फाईलवर त्यांनी स्वाक्षरी केली.

सेवा तीर्थ संकुलात, प्रधानमंत्री कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय आहे. हे नवीन संकुल आधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. कर्तव्य भवन-1 आणि 2 मध्ये अनेक प्रमुख खात्यांची कार्यालयं आहेत.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याच्या कामकाजाचा आज अखेरचा दिवस होता. आजच्या शेवटच्या दिवशीही लोकसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून गदारोळ केल्याने कामकाज स्थगित करण्यात आलं असून दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्चला सुरू होणार आहे.

लोकसभेत आज माजी खासदार दिवंगत भगवानदास राठोड यांना आदरांजली वाहिल्यानंतर प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात झाली. त्यावेळी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, डीएमके आणि अन्य विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ केल्याने कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित झालं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यावरही गदारोळ सुरुच राहिल्यानं पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचं कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित केलं.

**राज्यसभेतही** अर्थसंकल्पीय अधिवेशनच्या पहिल्या सत्राच्या अखेरच्या दिवशी सदस्यांनी विविध दस्तऐवज सभागृहाच्या पटलावर मांडले. राज्यसभेचे अध्यक्ष उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रपतींचा संदेश सभागृहात वाचून दाखवला. त्यानंतर राज्यसभेचंही कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मांडलेल्या वेगळ्या ठरावावर सभापतींशी चर्चा केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आज बातमीदारांना दिली. हा ठराव विशेषाधिकार समितीकडे पाठवायचा की नितीमूल्य समितीकडे द्यायचा की थेट सभागृहात चर्चेसाठी आणायचा याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असंही रिजिजू यांनी सांगितलं....

**होल्ड- बाईट- रिजिजू**

<><><><><>

माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री आणि रेल्वेमंत्री कान्हू चरण लेंका यांचं आज सकाळी भुवनेश्वर इथं निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. कान्हू चरण लेंका यांनी १९८८ ते १९९४ पर्यंत राज्यसभेत ओडिशाचं प्रतिनिधित्व केलं होतं. चौद्वार मतदारसंघातून ते चार वेळा ओडिशाच्या विधानसभेवर निवडून आले होते. तसंच ओडिशाच्या प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं होतं.

<><><><><>

आयटी क्षेत्रातल्या समभागांच्या विक्रीचा परिणाम आजही शेअर बाजारांवर दिसून आला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ४८ अंकांची घसरण झाली आणि तो ८२ हजार ६२७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३३६ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार ४७१ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

नवी दिल्लीत सुरु असलेल्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेच्या आजच्या शेवटच्या दिवशी भारतानं सात पदकांची कमाई केली आहे. यात पुरुषांच्या २५ मीटर सेंटर फायर पिस्टल प्रकारात तीनही पदकं भारतीय नेमबाजांनी जिंकली. महिलांच्या ५० मीटर रायफल प्रोन सांघिक स्पर्धेत भारतानं सुवर्णपदक पटकावलं, तर वैयक्तिक स्पर्धेत रजत आणि कास्य पदकं मिळवली. सर्व रायफल आणि पिस्टल प्रकारांमध्ये मिळून भारतानं एकूण ३३ पदकं मिळवली. त्यात १३ सुवर्ण, ११ रजत आणि ९ कांस्यपदकांचा समावेश आहे.

<><><><><>

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज कोलंबो इथं ब गटातल्या सामन्यात झिम्बाब्वेनं ऑस्ट्रेलियावर २३ धावांनी मात केली. प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेनं २० षटकात २ गडी गमावून १६९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा डाव ३ चेंडू बाकी असतानाच १४६ धावांवर आटोपला.

ड गटात आज नवी दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर झालेल्या सामन्यात यूएईने कॅनडावर ५ गडी राखून विजय मिळवला. चेन्नईत अ गटात अमेरिका आणि नेदरलँड यांच्यात सामना सुरू आहे.

महिला क्रिकेटमध्ये, बँकॉक इथं सुरू झालेल्या आशिया चषक रायझिंग स्टार्स क्रिकेट स्पर्धेत संयुक्त अरब अमिरातीच्या संघानं भारताच्या अ संघाचा ७ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारत अ संघानं २० षटकांत १३० धावा केल्या. संयुक्त अरब अमिरातीनं ७ गडी आणि ४ चेंडू राखून ही धावसंख्या पार केली.

भारतीय महिला संघाचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू झाला असून आज त्यांचा प्रदर्शनाचा सामना गव्हर्नर जनरल इलेव्हन संघाशी झाला. या सामन्यात भारताने ५ गडी राखून विजय मिळवला.

**<><><><><>**

केवळ आवाजाच्या माध्यमातून जग जोडणाऱ्या प्रसारणकर्मींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १३ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी रेडियो दिवस म्हणून साजरा केला जातो. कृत्रिम बुद्धिमत्तेचा या माध्यमातला वापर हे एक साधन राहील, ते मानवी आवाजाची जागा घेऊ शकणार नाही अशी यंदाच्या रेडियो दिनाची संकल्पना आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रेडिओ दिना निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

आकाशवाणीच्या वतीने छत्तीसगडमध्ये रायपूर इथं आज जागतिक रेडिओ दिन परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं. आकाशवाणी मुंबई आणि मुंबई दूरदर्शन यांनी आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात व्हॉक्स अँड व्हाईब्ज हा पाश्चात्य संगीताचा कार्यक्रम आयोजित केला. आकाशवाणी मुंबईचे गिटारवादक अमित रॉय, पायल मलिक, तसंच तेजस मेनन आणि सहकाऱ्यांनी यावेळी सादरीकरण केलं. या कार्यक्रमाची संपादित आवृत्ती येत्या बुधवारी रात्री साडेनऊ वाजता आकाशवाणी मुंबई च्या FM Rainbow वाहिनी वर प्रसारित केली जाईल.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१३ फेब्रुवारी २०२६ - शुक्रवार
**<><><><><>**

बांगलादेशातल्या सार्वत्रिक निवडणुकीत बांगला देश नॅशनलिस्ट पार्टी बीएनपी आणि मित्रपक्षांनी मिळून २८४ पैकी २१२ जागा मिळवल्या आहेत. त्यात बीएनपीला २०९ जागांवर विजय मिळाला आहे. बांगलादेश जमात ए इस्लामी पार्टी आणि मित्रपक्षांना ७७ जागा मिळाल्या आहेत. निकालांची अधिकृत घोषणा अद्याप व्हायची आहे. बांगला देशात विद्यार्थी आंदोलकांनी माजी प्रधानमंत्री शेख हसीना यांना पदच्युत केल्यानंतर ही पहिलीच निवडणूक आहे.

शेख हसीना यांना पदच्युत केल्यानंतर प्रसिद्ध केलेल्या जुलै जाहीरनाम्यावरही आज जनमत घेण्यात आलं. त्यात ६० पूर्णांक २६ शतांश टक्के नागरिकांनी मतदान केलं. जाहीरनामा स्वीकारण्याच्या बाजूनं ४ कोटी ८० लाख ७४ हजार ४२९ मतं पडली, तर २ कोटी २५ लाख ६५ हजार ६२७ मतं त्याच्या विरोधात पडल्याचं तिथले निवडणूक आयोगाचे वरिष्ठ सचिव अख्तर अहमद यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**